बा. ना. बांदोडकर महाविद्यालय आणि क्विकहील फाउंडेशन व महाराष्ट्र सायबर यांच्या संयुक्त विद्यमान

# 'कमवा आणि शिका' या योजनेचा प्रारंभ

**ठाणे (प्रतिनिधी)-** विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त महाविद्यालय ठाणे आणि क्विकहील फाउंडेशन व महाराष्ट्र सायबर यांच्या संयुक्त विद्यमाने माहिती तंत्रज्ञान व संगणक विज्ञान या विभागांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'कमवा आणि शिका' या योजनेचा प्रारंभ करण्यात आला. कमवा आणि शिका या योजनेमध्ये विद्यार्थी प्रथम क्विकहिल फाउंडेशन कडून सायबर सुरक्षा विषयी प्रशिक्षण घेऊन इतर शाळा व महाविद्यालयांमध्ये जाऊन सायबर जागरूकता मोहीम राबवणार आहेत. दिनांक २९ ऑगस्ट २०२३ रोजी क्विकहील फाउंडेशन ने बांदोडकर महाविद्यालयामध्ये इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना एक दिवसीय कार्यशाळेद्वारे 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' अंतर्गत प्रशिक्षण दिले.



महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक केले. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि माहिती तंत्रज्ञान व संगणक विज्ञान विभाग प्रमुख प्राध्यापक अभिजीत काळे यांनी विद्यार्थ्यांना कमवा व शिका या योजनेमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित केले. महाराष्ट्र सायबर विभागातर्फे विजय सुतार आणि शैलेश साळुंखे यांनी सायबर गुन्हे, सायबर गुन्ह्यांचे प्रकार, त्यावरील उपाययोजना, सायबर गुन्ह्यांपासून कसे सुरक्षित रहावे, तसेच सायबर गुन्हा घडला असल्यास तक्रार कशी करावी अशा विविध गोष्टीबाबत मार्गदर्शन केले. क्विकहिल फाउंडेशनच्या सीएसआर सीनियर एक्झिक्युटिव्ह सुगंधा दानी यांनी सायबर सुरक्षेचे महत्त्व, तसेच सागर सुरक्षा जागरूकता मोहीम शाळा आणि महाविद्यालयांमध्ये कशी राबवावी?, समाजाच्या अगदी शेवटच्या घटकांपर्यंत सायबर सुरक्षा जागरूकता मोहीम कसे पोहोचवावी? स्वतःला सायबर सुरक्षित कसे ठेवावे? अशा विविध गोष्टीं बाबत मार्गदर्शन केले. या एक दिवसीय कार्यशाळेचे सूत्रबद्ध नियोजन प्राध्यापक अंकिता शिंदे आणि विद्यार्थी प्रतिनिधी अक्षेषा भोसले यांनी अतिशय उत्कृष्ट रित्या केले. या कार्यशाळेची सांगता राष्ट्रगीत गायनाने झाली.